MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Issue-17, Vol-12, Jan. to Mar.2017

# विद्यावार्ता®

International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G. Gholap

Scanned by CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

Jan. To Mar. 2017
Issue-17, Vol-12

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
Mobi. 09850203295, 07588057695



Scanned by CamScanner

आहे. विचार प्रसार हे त्यांचे प्रमुख अंग आहे. एखाद्या डॉक्टरने अप्रामाणिकपणा केला तर दहा-पाच रोगी दगावतील. एखाद्या इंजिनियरने लबाडी केली तर चार-दोन इमारती अल्पायुषी ठरतील. एखाद्या वकिलाने दुटप्पी भूमिका घेतली तर चार-दोन अशीलांचे वैयक्तीक नुकसान होईल. पण एखाद्या प्रसार माध्यमाने लोकशिक्षणाची आणि विचारजागृतीची आपली मूळ भूमिका सोडली आणि समाजाची दिशाभूल करण्याचे धोरण जाणीवपूर्वक चालविले तर अगदी अल्पावधीतच लक्षावधी नागरिकांची प्रचंड दिशाभूल होऊ शकते. समाजाचे वास्तव चित्र बाजूला पडते. म्हणूनच वैचारिक स्वरूपाच्या प्रसार माध्यमाला आपल्या भूमिकेची आणि जबाबदारीची जाणीव सातत्याने जागती ठेवावी लागते.

**संदर्भ सूची**

१) "Forntiers of Communitacion", डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी.

२) "Mass Media : Communitacion, Theories, Research and Culture", डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी.

३) "जनसंवाद आणि जनमाध्यम:सैद्धांतिक संकल्पन", डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी.

४) "सोशल मीडिया, डिजीटल दुनिया" : प्रफुल्ल सुतार.

५) "Real Communication : An Introduction" Jason Teven

६) "Advertising Promotion and Mass Media" T. Prakash, 2008.

❑❑❑

23

# भारतातील स्वच्छता, आव्हाणे व उपाययोजना

प्रा. आर.बी.काळे
समाजशास्त्र विभाग, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी म्हटले होते की, "स्वच्छता ही स्वातंत्र्यापेक्षा महत्वपूर्ण आहे." या वरुन आपल्याला स्वच्छतेचे महत्व लक्षात घेता येवु शकते. कोणत्याही देशाचा विकास होण्यासाठी त्या देशातील स्वच्छता अतिशय महत्वाची असते. भारत देश ही त्याला अपवाद नाही. भारत देश विकसनशील असल्यामुळे ज्या पध्दतीने पुढे जात आहे. त्यामध्ये 'अस्वच्छता' हा घटक अडथळा निर्माण करताना दिसून येतो. २०२० पर्यंत भारत हा महासत्ता बनेल असे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी म्हटले आहे. कारण भारतामध्ये उत्पादक लोकसंख्या महासत्ता बनण्यासाठी महत्वपूर्ण ठरू शकेल परंतु त्यासाठी हा वर्ग सुदृढ असणे गरजेचे आहे. म्हणून स्वच्छता हा घटक देशाच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरतो.

स्वातंत्र्य चळवळीपासून अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वच्छतेचे महत्व जाणले होते. महात्मा गांधी यांच्यापासून ते सेनापती बापट, साने गुरुजी, संत गाडगे बाबा या सर्वांनी हातात झाडू घेवून लोकांना स्वच्छतेची महती पटवून देण्याचे कार्य केले. कारण अस्वच्छता हे रोगराईच्या अनेक कारणापैकी प्रमुख कारण आहे. अस्वच्छता मग ती व्यक्तीगत असो की सार्वजनिक. आरोग्य तर बिघडतेच शिवाय कुटूंबाचे आणि देशाचे आरोग्यही बिघडते. सार्वजनिक अस्वच्छतेमुळे संपूर्ण देशाचे आरोग्य धोक्यात येवु पाहत आहे. त्यामुळे आज देशाच्या विकासाला खीळ बसत आहे. अस्वच्छतेमुळे आर्थिक नुकसान तर होतेच परंतु त्याचबरोबर सामाजिक आणि मानवी विकासावर परिणाम होत आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टे:**

१. भारतातील स्वच्छतेविषयी सद्यस्थितीचा आढावा घेणे.
२. स्वच्छता संदर्भातील भारतासमोरील आव्हाणे जाणून घेणे.
३. अस्वच्छतेवर उपाययोजना सुचविणे.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत अध्ययनासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग



Scanned by CamScanner

करण्यात आला. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इ.

**भारतातील स्वच्छतेविषयी सद्यस्थिती :**

भारत सरकारने १९८६ मध्ये केंद्रिय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम (CRSP) सुरू करून देशभर लागू केला. या योजनेचा प्रचार व प्रसार होवू शकला नाही. ही योजना होण्याच्या मार्गावर असताना सन १९९९-२००० मध्ये संपूर्ण स्वच्छता अभियान (TSC) ची योजना सुरु झाली. या योजनेत माहिती, शिक्षण व संवाद (IEC) वर भर देण्यात आला. या योजनेचा प्रचार केरळ, गुजरात, महाराष्ट्र, हरियाना, पश्चिम- बंगाल या राज्यामध्ये प्रभावीपणे करण्यात आला. परंतू हवे तसे परिणाम झाले नाही. २०१२ मध्ये (TSC) चे नामकरण करून (NBA) निर्मळ भारत अभियान करण्यात आले. तसेच प्रत्येक राज्यामध्ये स्वच्छतेच्या वेगवेगळ्या योजना कार्यक्रम लागू केले. जसे महाराष्ट्रात सन २००० पासून संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान सुरू केले या पध्दतीने संपूर्ण देशभर स्वच्छतेच्या वेगवेगळ्या योजना राबविल्या जावू लागल्या. वैयक्तीक पातळीवर देखील डॉ.बिंदेश्वर पाठक यांनी सन १९७० पासून सुलभ शौचालयाची चळवळ उभी करून संपूर्ण देशात सार्वजनिक ठिकाणी संपूर्ण देशात सुलभ शौचालये उभी केली. भारत सरकारने पेयजल व स्वच्छता मंत्रालयाची स्वतंत्र स्थापना सन २०११ मध्ये केली. या पूर्वी ग्राम विकास मंत्रालयाच्या अंतर्गत हा विभाग चालविला जात होता. ग्रामीण भागातील लोकांना वैयक्तीक शौचालय बांधण्यास लावणे, त्यासाठी अनुदान देणे, स्वच्छतेसाठी लोकांच्या जनजागृती करण्यावर या अभियानात भर दिला जातो.

भारत सरकारने दि.२ ऑक्टोबर २०१४ पासून देशात 'स्वच्छ भारत अभियान' (SBA) असे योजनेचे नामकरण करून स्वच्छतेची व्यापकता वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. भारतामध्ये जगाच्या लोकसंख्येपैकी जवळपास १ अब्ज २१ कोटी लोक भारतात राहतात. या लोकसंख्येला स्वच्छ पर्यावरण उपलब्ध झाले तर खऱ्या अर्थाने भारत हा महासत्ता बनल्याशिवाय राहणार नाही. आज भारतातील स्वच्छतेविषयी सद्यस्थिती पाहिली तर आपल्याला असे लक्षात येते की, भारतामध्ये गंभीर स्वरुपात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. जल प्रदूषण, वायु-प्रदूषण, भूमी- प्रदूषण इ. प्रदूषणामुळे व्यक्तीला सुदृढ आरोग्य लाभत नाही. 'जगात जवळपास १.१ अब्ज लोकांना शुध्द पिण्याचे पाणी मिळत नाही. तर २.४ अब्ज लोकांना पुरेसे स्वच्छतेसाठी पाणी उपलब्ध होत नाही.' यापेक्षा भारताची स्थिती वेगळी नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे स्वच्छतेविषयी असणारी उदासिनता, अज्ञानपणा, अशिक्षितपणा, अंधश्रध्दा इ. बाबी लक्षात घेता येवू शकतात. नद्यांचे वाढत चाललेले प्रदुषण, धार्मीक स्थळांची अस्वच्छता, पर्यटनाच्या ठिकाणी असणारी अस्वच्छता यामुळे अधिकाधिक लोकांचे शारिरिक आरोग्य आज धोक्यात आलेले दिसून येते. '२००९ साली शहरी भागातील १४ वर्षांखालील मुलांना अस्वच्छतेमुळे झालेल्या आजारावरील खर्च ५०० कोटी रुपयांच्या घरात होता.' सर्वांकरता देशाच्या आर्थिक विकासाला अडथळा निर्माण होत चाललेला आहे. 'सन २०११ या जनगणनेनुसार देशातील ४६.९% कुटूंबाकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध झाली आहे. अजूनही देशात ५३.१% कुटूंबाकडे ही सुविधा उपलब्ध नाही.' यावरून लक्षात घेता येवू शकते की, शौचालयाची सुविधा सर्वांना उपलब्ध नसल्यामुळे हे कुटूंब उघड्यावर शौचास जावून पर्यावरण प्रदुषणाबरोबर लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. स्वच्छतेच्या मुलभूत सुविधेमुळे घरातील महिलांना सुरक्षितता प्राप्त होत असते. परंतू शौचालयाच्या अभावामुळे रात्र होण्याची वाट पहावी लागते. अंधारात सुरक्षिततेची खात्री मिळत नाही. त्यातून त्यांच्यावर बलत्कार, छेडछाड असे प्रसंग ओढवतात. त्याचबरोबर विंचू, सर्पदंश होण्यातून मृत्यूची शक्यता ओढवली जाते. तसेच दिवसा शौचास जाता येत नसल्यामुळे आरोग्याच्या समस्या स्त्रियामध्ये निर्माण झालेल्या लक्षात घेता येवू शकतात. 'भारतात मुलींच्या शिक्षणाच्या गळतीचे प्रमाण पाहिले तर शिक्षण घेण्याच्या ठिकाणी स्वच्छतेच्या सुविधांचा अभावामुळे २२% मुलीं फक्त दहावी पर्यंत शिक्षण घेतात.' यामुळे असे दिसून येते की या प्रश्नाने अत्यंत गंभीर स्वरुप धारण केलेले आहे. आर्थीक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्याच्या समस्या यातून निर्माण झाल्या आहे.

भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे झोपडपट्ट्या निर्माण झालेल्या ठिकाणी तेथील अस्वच्छतेमुळे महिला, लहान मुले, वृध्द यांच्या जीवनमानावर परिणाम होताना दिसून येतो. शहरामध्ये घनकचरा कोठे टाकावा इथपासून शहरामध्ये कचऱ्याची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे डास व माशा निर्माण होतात. परिणामी डेंगु, मलेरिया इ. आजार उद्‌भवताना दिसून येतात. शहरातील गोळा झालेला कचरा उचलण्यासाठी तेथील प्रशासन कोणते कार्य करते ते सुध्दा स्वच्छतेसाठी महत्वाचे आहे. शहरातील गोळा झालेला कचरा शहराच्या बाहेर टाकला जातो. शहरात कचरा टाकण्यासाठी जागेची समस्या निर्माण झाली आहे. कचऱ्याची कायमस्वरुपी विल्हेवाट न लावल्यामुळे त्याचा परिणाम लोकांच्या आरोग्यावर होताना दिसून येतो. एवढेच नव्हे तर पिण्याच्या अशुध्द पाण्यामुळे अनेक रोग निर्माण झाले आहे. विशेषतः लहान मुलांचे होणारे मृत्यू डार्यारिया या सारख्या आजाराने बालमृत्यू होत आहे. 'जगातील ५ वर्षांखालील लहान मुलांच्या मृत्यूमध्ये डार्यारिया या आजाराचे प्रमाण सर्वाधिक आहे. भारतामध्ये दरवर्षी ५ वर्षांखालील ८ लाख मुलांचा मृत्यू डार्यारियामुळे होतो.' भारतामध्ये लोक उघड्यावर मलविसर्जन करतात, त्यामुळे तेथे दुर्गंधी पसरते एवढेच नाही तर तंबाखु, गुटखा, सिगारेट खाऊन रस्त्यावर थुंकतात त्यामुळे रस्ते तर खराब होतात त्याचबरोबर त्याचा परिणाम आरोग्यावर होत असतो.



Scanned by CamScanner

**आव्हाणे :**

- "भारतातील जवळपास ५९ कोटी लोक आज उघड्यावर शौचाला बसतात. त्यापैकी अनेकाकडे शौचालय असूनही ते उघड्यावर शौचालयाला जाणे पसंत करतात. त्या लोकांच्या वर्तनात बदल घडवून आणणे हे सर्वात मोठे आव्हाण आहे. शौचालयाचा वापर करण्यासाठी पाण्याची गरज भागविणे, बांधलेली परंतु वापरात नसलेल्या किंवा बंद पडलेल्या शौचालयाचा प्रश्न ग्रामीण भागात स्वच्छता व्यवस्था पाहण्यासाठी पुरेसा कर्मचाऱ्यांची कमतरता हे आव्हाण निर्माण झाले आहे."[१]
- भारतामध्ये सर्व समस्यासाठी कोणते प्रमुख कारण असेल तर ते म्हणजे देशातील वाढती लोकसंख्या भारताची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली असल्यामुळे देशाच्या विकासामध्ये अडथळा निर्माण होत आहे. लोकसंख्येवर नियंत्रण आणणे हे आव्हाण भारतासमोर उभे आहे.
- भारतामध्ये धार्मिक अंधश्रध्देमुळे धार्मीक स्थळांच्या ठिकाणी नद्यांचे होणारे दुषित पाणी ही बाब गंभीर स्वरुपात वाढत चाललेली आहे.
- कचऱ्याचे समुळ उच्चाटण कसे करता येईल हे आव्हाण निर्माण झाले आहे.
- अस्वच्छ पाणी, अस्वच्छ परिसर यामुळे आरोग्याचा प्रश्न, पर्यावरणविषयक प्रश्न असे अनेक गंभीर प्रश्न समाजासमोर आ-वासून निर्माण झाले आहेत. अस्वच्छ पाण्यामुळे आजाराचे प्रमाण वाढले आहे, त्यामुळे बालकांचे मृत्यूचे प्रमाण, स्त्रीयांच्या आरोग्याचा प्रश्न खूप मोठ्या प्रमाणात निर्माण झाले आहे.

**उपाययोजना :-**

- ज्या पध्दतीने राजकीय पक्ष सर्व मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी सर्वोतरी प्रयत्न करतात. त्यामध्ये सोशल मिडीया, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, प्रसिध्दी माध्यमे यांचा वापर करुन सर्व घटकांना आपल्या पक्षाकडे मतदान होण्यासाठी जी मोहीम हाती घेतात त्याच पध्दतीने स्वच्छतेच्या संदर्भात जनजागृती घडवून आणण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.
- प्राथमिक शाळेतील विद्यार्थी ते वयोवृध्द असा सर्व लोकसंख्येच्या प्रत्येक घटकाला स्वच्छतेचा आरोग्याशी असलेल्या संबंधाबाबत जाणिव करुन देणे. ग्रामपंचायत ,शाळा, अंगणवाडी यांचा सहभाग स्वच्छतेमध्ये महत्वाचा आहे. परिसर स्वच्छता, वैयक्तीक स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छतेमध्ये सहभाग करुन घेणे.
- शौचालय बांधण्यासाठी ग्रामीण भागासाठी शासकीय अनुदान सुरु आहे ते वंचित घटकापर्यंत पोहचविणे व त्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे महत्वाचे आहे. ग्रामिण भागातील वंचित घटकांना कोणत्याही प्रकारची माहिती पोहचत नसल्यामुळे स्वच्छतेच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट होत नाही, त्यामुळे त्यांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे.
- ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थेने आपल्या गावात सार्वजनिक शौचालये उभारुन देणे. त्यामुळे त्यांच्याकडे वैयक्तीक शौचालय नाहीत अशा कुटुंबातील व्यक्ती सार्वजनिक शौचालयाचा वापर करु शकतात त्यामुळे गावातील अस्वच्छतेची समस्या दुर होण्यास मदत होऊ शकते.
- आवश्यक स्वरुपात न मिळणाऱ्या पाण्यामुळे लोक उघड्यावर शौच करण्यास जातात हे वास्तव आहे. त्यामुळे पुरेसा प्रमाणात प्रत्येक कुटुंबाला पाणी उपलब्ध करुन देणे.
- पुर्वनियोजित वेळी घराघरातून नैसर्गिक आणि अप्राकृतिक कचरा रोजच्या रोज उचलला जावा. तसेच ( ओला व सुका ) कचऱ्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावावी. तसेच सुका कचऱ्याचा पुर्नवापर करण्याचा प्रयत्न करावा.
- आरोग्यविषयक जाणिव नसल्याने परिसर स्वच्छ ठेवावा, परिसरात कोठेही पाणी साचू देवू नये त्यामुळे डास होतात, परिणामी विविध आजार फैलवतात याची जाणिव नसते. अशा ठिकाणी स्वच्छतेविषयी प्रबोधन करणे.
- कायद्याच्या माध्यमातून अस्वच्छ परिसर करणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करणे.

**संदर्भ :-**

१. Akram, Mohammad, Sociology of sanitation, kalpaz publication, Delhi २०१५. P-७४

२. आडलकर, रुपी- भारताच्या शहरी पर्यावरणातील आव्हाणे जमिनीचा वापर, घनकचरा आणि स्वच्छता, योजना, डिसेंबर २०१३ पृ.क्र. ६८, ६९.

३. कवाडे, चंद्रकांत, स्वच्छतेकडून सामाजिक बदलाकडे, योजना, जानेवारी २०१५ पृ.क्र. २४.

४. Akram, Mohammad, Sociology of sanitation, kalpaz publication, Delhi- २०१५. P-३९

५. कवाडे, चंद्रकांत, स्वच्छतेकडून सामाजिक बदलाकडे, योजना, जानेवारी २०१५, पृ.क्र. २८.

६. धायले, पी.आर., सामाजिक स्वच्छता की जरुरत, समलोग मासिक जानेवारी २०१४.

७. योजना जानेवारी २०१५.

८. शुक्ला, अरविन्द, स्वच्छ भारत अभियान, शुक पब्लिकेशन्स, लखनऊ, २०१६.

□□□



Scanned by CamScanner